25 वर्षे विकासाची
"माझे शहर, माझा अभिमान"

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता. ठाणे - 401 101 दुरध्वनी क्रं. 28192828

**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**

जा.क्र.मिभा/मनपा/पा.पु.व मलनि/ ६८३ /२०२६-२७ दि. २२/०६/२०२६

**विषय - प्रेस नोट प्रसिद्ध करणेबाबत.**

## // प्रेसनोट //

## शुद्धीपत्रक

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, मिरा-भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम. आय. डी. सी.) कडून पाणी पुरवठा करण्यात येतो.

**अलनिनो (El Nino) व आयओडीच्या (IOD) प्रभावामुळे समुद्र प्रवाह सक्रिय झाल्यामुळे या वर्षी पावसाळा लांबण्याची शक्यता आहे. संभाव्य पाणी टंचाईचे संकट लक्षात घेता जलसंपदा विभाग, पाठबंधारे कळवा, ठाणे यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (MIDC) प्रत्येक आठवड्यातील एक दिवस पाणी कपात करण्याचे ठरले आहे.**

**त्यानुसार त्यानुसार स्टेम प्राधिकरणाकडून दर बुधवारी सकाळी 09:00 ते गुरुवारी सकाळी 09:00 वाजेपर्यंत (24 तासाकरिता) मिरा-भाईंदर शहरास होणारा पाणी पुरवठा बंद राहील. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (MIDC) होणारा पाणी पुरवठा दर बुधवारी रात्री 12:00 ते शुक्रवारी रात्री 12:00 वाजेपर्यंत बंद असलेबाबत सुचना देण्यात आली होती.**

**परंतू दि.26/06/2026 रोजी मोहरम हा सण असल्याकारणाने या आठवड्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (MIDC) मिरा-भाईंदर शहरास होणारा पाणी पुरवठा शक्रवार दि.26/06/2026 रोजी रात्री 12:00 ते रविवार दि.28/06/2026 रोजी रात्री 12:00 वाजेपर्यंत (48 तासाकरीता) बंद राहील.** तसेच स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा सुरु राहणार आहे.

तरी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (MIDC) होणारा पाणी पुरवठा पुर्ववत होईपर्यत मिरा-भाईंदर शहरास पाणी पुरवठा कमी दाबाने व उशीराने होईल. नागरीकांनी पाण्याचा अपव्यय टाळावा आणि पाणी बचतीसाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेस सहकार्य करावे.

**(शरद नानेगांवकर)**
**कार्यकारी अभियंता**
**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**
**जनसंपर्क अधिकारी,**
जनसंपर्क विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका



Receipt No. 9238726/2026/MBMC-WATER SUPPLY (Computer No. 9238726)
Generated from eOffice by Sunil Madan Rathod, CLRK(SR)IT, CLERK, MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION on 23/06/2026 03:41 PM
Scanned with CamScanner